महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४५०, ई-मेल – desk2a@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक
क्रमांक: २अ/एडीएम/ २०२०/ १७३ दिनांक : 18 JUN 2020

विषय : Covid 19 विषाणूच्या संसर्गामुळे उदभवलेल्या संकटकालिन परिस्थितीत शिक्षण संस्थांच्या शिक्षण शुल्कात व इतर शुल्कात वाढ न करणेबाबत...

संदर्भ : मा. अमित खरे (भा.प्र.से.),सचिव, उच्चत्तर शिक्षण विभाग, मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे अ.शा. पत्र क्र. १३-१/२०२०-टीसी, दि. २९ -०४-२०२०

मा. अमित खरे (भा.प्र.से.),सचिव, उच्चत्तर शिक्षण विभाग, मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी देशातील सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेश यांचे मा.मुख्य सचिवाना उद्देशुन लिहिलेल्या पत्रात नमूद केल्यानुसार सध्या Covid १९ या विषाणूच्या संसर्गामुळे उद्भवलेल्या महामारीच्या जागतिक आरोग्य संकटातून आपण सर्व जात आहोत. दुस-या महायुध्दानंतर उदभवलेली करोना संसर्ग संकटाची अभूतपूर्व परिस्थिती समाजातील सर्व घटकांवर खोल आर्थिक परिणाम करणारी ठरली आहे. ही वस्तुस्थिती विचारात घेता व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये शिक्षणशुल्क किंवा इतर शुल्कामध्ये कोणतीही वाढ करु नये असे आवाहन केले आहे. सदर पत्रात केलेल्या सुचनेनुसार राज्यातील सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या आवाहन करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये शिक्षणशुल्क किंवा इतर शुल्कामध्ये कोणतीही वाढ करु नये.

( डॉ. अभय वाघ )
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : माहितीस्तव सादर
१. मा.सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
२. मा.अध्यक्ष/सचिव,शिक्षण शुल्क प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य, मुंबई ५१

पृष्ठांकन क्र. विकाऔ/शिक्षण/२०२०/ १०००
दिनांकः- 18 JUN 2020

या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व व्यावसायिक पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थां प्रमुख यांना सुचित करण्यात येते की, Covid-19 विषाणूच्या संसर्गामुळे उदभवलेल्या संकटकालिन परिस्थितीत शिक्षण शुल्कात व इतर शुल्कात वाढ न करणेबाबतचे सोबत जोडलेल्या परिपत्रकात दिलेल्या सुचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी